MHGA040003822025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १७.०७.२०२५ |
| नोंदणी तारीख | : | १७.०७.२०२५ |
| निकाल तारीख | : | ०४.०५.२०२६ |
| कालावधी | : | ००वर्ष, ०९म.,१७दि. |

**<u>नि.क्र.८ वर</u>**

| | |
|---|---|
| | **<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय</u>**<br>**<u>(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)</u>**<br>**(न्यायनिर्णयाची तारीख :०४/०५/२०२६)**<br>**सं.फौ.मा.क्र.२२२/२०२५** |
| | अपराध क्र. :३५१/२०२४<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **<u>तक्रारदार</u>** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली |
| **<u>अधिवक्ता</u>** | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. उईके |
| **<u>आरोपी</u>** | **तारकेश्वर पुंडलिक साखरकर,**<br>वय ३७ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>राह. सावंगी, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली |
| **<u>अधिवक्ता</u>** | आरोपीचे विधिज्ञ श्रीमती पठान |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | २०.१०.२०२४ |
| प्रथम खबरेची तारीख | ३०.१०.२०२४ |
| आरोपपत्राची तारीख | १७.०७.२०२५ |
| अपराधाचा तपशिल तयार करण्याची तारीख | १६.१०.२०२५ |
| पुरावा सुरु होण्याची तारीख | ०४.०४.२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | काही नाही. |
| निकालाची तारीख | ०४.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | काही नाही. |

## <u>आरोपीचा तपशिल</u>

| क्र. | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर सुटण्याची तारीख | आरोप केलेले गुन्हे | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४६८ भा.ना.सु.सं. च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तारकेश्वर पुंडलिक साखरकर | कलम ३५(३) भा.ना.सु.सं. सुचनापत्र दिले. | २८१, १२५(अ), १२५(ब) भा.न्या.सं. | निर्दोष | नाही | काही नाही |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक ०४ मे, २०२६ रोजी घोषित)

आरोपीवर भारतीय न्याय संहिताचे कलम २८१, १२५(अ), १२५(ब) अन्वये दंडनिय अपराधांकरीता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

**अभियोग पक्षाचे कथन** :-

२. दि.२०.१०.२०२४ रोजी फिर्यादी अतुल पंढरीनाथ लक्षणे हे याचे दुचाकी वाहन एम.एच. ३३ एक्स ९९१७ या वाहनाने त्याची आई व लहान मुलासह आरमोरी वरुन ठाणेगांव येथे जात असतांना आमरेरी ते गडचिरोली जाणाऱ्या रोडवर जुना बस स्थानक, आरमोरी येथे दुपारी अंदाजे १२.५१ वाजता एक चारचाकी पिकअप वाहन क्र.एम.एच.४९ ए.टी. ८५६१ या वाहन चालकाने फिर्यादीच्या दुचाकीला मागुन धडक दिली. त्यामुळे फिर्यादी, त्याची आई व मुलगा खाली पडले व फिर्यादीचे उजव्या हाताला मार लागला, त्याचे आईला किरकोळ मार लागला. त्यानंतर फिर्यादी व त्याचे आईला दवाखान्यात नेण्यात आले. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशन, आरमोरीला तोंडी रिपोर्ट दिली. सदर फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द अपराध क्र.३५१/२०२४, कलम २८१, १२५(अ), १२५(ब) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर प्रकरणाचा तपास महिला पो.हवा. कुंदा प्रधान हिच्याकडे देण्यात आला. तपासी अंमलदार हि साक्षीदारांची बयाणे नोंदविली, घटनास्थळ पंचनामा केला व आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने दोषारोपपत्र दाखल केले.

३. या न्यायालयाने आरोपी विरुध्द नि.क्र.ने८ वर भारतीय न्याय संहिताचे कलम २८१, १२५(अ), १२८(ब) अन्वये अपराधाचा तपशिल ठेवला. अपराधाच्या तपशिलातील आरोप आरोपीला वाचुन व समजावुन सांगण्यात आले. आरोपीने गुन्हा कबूल नाही असे

सांगितले आणि संपरिक्षा चालविण्याची मागणी केली. आरोपी विरुध्दचा आरोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाने फिर्यादीला तपासले. आरोपी विरुध्द काहीही न आल्याने त्यांचे कलम ३५१(१)(ब) भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे बयाण नोंदविण्यात आले नाही. आरोपीने त्याच्या बचावाकरीता कोणतेही पुरावे सादर केलेले नाही.

४. वरील विवेचनावरुन खोलील मुद्दे माझे समोर उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणानुसार त्यांचे समोर नोंदवित आहे.

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे कायं दि.२०.१०.२०२४ रोजी १२.५१ ते ०१.३० वाजताचे दरम्यान मौजा आरमोरी येथील बस स्थानक, ता. आरमोरी, जि. गडचिरोली आरोपीने त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन क्र.एम.एच. ४९ ए.टी. ८५६१ हे वाहन इतर लोकांचे मानवी जिवन धोक्यात येईल अथवा त्याला दुखापत किंवा क्षती पोहचविण्याचा संभव असुन देखील बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविले, त्याद्वारे आरोपीने कलम **२८१** भा.न्या.सं. अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे कायं वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन क्र.एम.एच. ४९ ए.टी. ८५६१ हे वाहन जिवीत व्यक्तीची जिवीत व व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल असे हयगयीने, बेदरकारपणे व निष्काळजीपणे वाहन चालविण्याची कृती करुन फिर्यादीची आईला किरकोळ मार लागुन तिला साधी दुखापत पोहचविली, त्याद्वारे आरोपीने कलम **१२५(अ)** भा.न्या.सं. अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे कायं वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन क्र.एम.एच. ४९ ए.टी. ८५६१ हे वाहन जिवीत व्यक्तीची जिवीत व व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल असे हयगयीने, बेदरकारपणे व निष्काळजीपणे वाहन चालविण्याची कृती करुन फिर्यादीची दुचाकी एम.एच.३३ एक्स ९९१७ या वाहनाला धडक दिल्याने फिर्यादीचे उजव्या हाताची मनगटा जवळील हाड तुटल्याने गंभीर दुखापत पोहचविली, त्याद्वारे आरोपीने कलम **१२५(ब)** भा.न्यां.सं. अन्वये गुन्हा केला ? | ... नाही. |
| ४ | आदेश काय ? | आरोपीस दोषमुक्त करण्यात येते. |

## कारणे-मिमांसा

## फिर्यादी पक्ष/आरोपी पक्ष/न्यायालयातील साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष :-**

| सा. क्र. | नाव | नि.क्र. | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १. | अतुल पंढरीनाथ लक्षणे | ८ वर | फिर्यादी |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

**क. न्यायालयाकडुन साक्षीदार, जर असेल तर :-**

| क्र. | नाव | निशाणी क्रमांक | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकिय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| निरंक | | | |

## फिर्यादी/आरोपी/न्यायालयातील दस्तऐवजांची यादी

**अ. फिर्यादी :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ब. बचाव :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. भौतीक वस्तु :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

## मुद्दा क्र.१ ते ४ :-

५. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द कथन सिद्ध करण्यासाठी फिर्यादी अतल लक्षणे (सा.क्र.१) याला तपासले आहे. त्याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, घटना

दि.२०.१०.२०२४ रोजी घडली होती. त्याचे दुचाकीचा अपघात झाला होता, त्यामुळे रागाच्या भरात त्याने आरोपी विरुध्द पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता. परंतु फिर्यादीने रिपोर्ट मधील मजकुर त्याला आठवत नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सदर न्यायालयाने त्याचा उलटतपास घेतला असता त्याने मान्य केले की, त्याचा आरोपी सोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाला आहे व त्याला सदर प्रकरण चालवायचे नाही.

६. एकंदरीत अभिलेखाचे अवलोकन केले असता फिर्यादी अतुल (सा.क्र.१) याचे दुचाकीला आरोपीने त्याचे चारचाकी वाहनाने धडक देऊन फिर्यादीला गंभीर जखमी केले आणि फिर्यादीच्या आईला किरकोळ जखमी केले याबाबत काहीही आलेले नाही. फिर्यादी हा जखमी साक्षीदार आहे व त्याने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. अभिलेखावर दाखल पुरसिस नि.क्र.११ मध्ये फिर्यादीने नमुद केले आहे की, त्याचा आरोपी सोबत आपसी समझोता झाला आहे व त्याला आरोपी विरुध्द प्रकरण चालवायचे नाही. त्यामुळे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरुन आरोपीने सदर गुन्हा केला हे अभियोग पक्ष संशयापलीकडे सिध्द करु शकले नाही. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देण्यात येतो. म्हणुन मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते व मुद्दा क्र.४ चे अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी नामे **तारकेश्वर पुंडलिक साखरकर** याला भारतीय न्याय संहिताचे कलम **२८१, १२५(अ), १२५(ब)** अन्वये दंडनीय अपराधांच्या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. जप्त टाटा मोटर्स कंपनीचे चारचाकी वाहन क्र.एम.एच. ४९ ए.टी. ८५६१ चे मालकाने सुप्रतनामा बंधपत्रावर सोडलेले आहे, अपिल कालावधी संपल्यानंतर सदर वाहन मालकास नेहमी करीता देण्यात येते.

३. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र आणि जामिन बंधपत्र रद्द करण्यात येते.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) अन्वये रु.१५,०००/- प्रमाणे वैयक्तीक व जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.05.04 17:31:00 +0530

स्थळ : आरमोरी
दि.०४.०५.२०२६

(श्रीमती व्ही. व्ही. चौधरी)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी